# गावकऱ्यांच्या उत्साहात यशोदा नदी संवाद यात्रेस प्रारंभ

## बोरी येथे शिवारफेरी, जलपूजन, जलप्रतिज्ञा : नदीला वाचविण्यासाठी गावकऱ्यांचे प्रबोधन

**सकाळ वृत्तसेवा**

वर्धा, ता. ३० : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरु करण्यात आलेल्या चला जाणूया नदीला अभियानांतर्गत यशोदा नदीच्या संवाद यात्रेस आज आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथे गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभागाने सुरुवात झाली. नदीचे जलपुजन केल्यानंतर शिवारफेरी काढण्यात आली. त्यानंतर गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी बोरीच्या सरपंच मिराकनेरी, उपसरपंच सोनाली मुंदेकर, सदस्य शंकर कासार, नदी समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, उल्हास जैन, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रिय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे, सेंद्रीय शेती शेतकरी दिलीप राम, मुख्याध्यापक पुप्पलवार आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळेत झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांनी यशोदा नदी संवाद यात्रेचे महत्त्व सांगितले. नद्यांमध्ये अलिकडे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत आहे. नदी पात्रात अतिक्रमण होत असल्याचे तिचे प्रवाह बदलत आहे. नदीची जैवविविधता, तिचे पावित्र्य अलिकडे नष्ट होत आहे. त्यामुळे नदीला वाचविणे फार आवश्यक झाले आहे. त्यासाठीच नदी संवाद यात्रा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मान्यवरांनी सांगितले.



नदीला तिचे पूर्वीचे सुंदर रुप प्राप्त करून देण्यासाठी गावकऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या अभियानात गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.


### नैसर्गीक शेतीच्या महत्त्वावरही मार्गदर्शन

▪ नदीचे पुजन केल्यानंतर गावात शिवारफेरी काढण्यात आली. या फेरीत ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नदी संवाद यात्रेनिमित्त तयार करण्यात आलेल्या जनजागृती घडिपुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. नैसर्गिक शेती करणारे शेतकरी दिपील राम यांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. नैसर्गित शेतीचे महत्व या विषयावर या शेतकऱ्याने उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला बजाज फाऊंडेशनचे विजय ठाकरे, प्रशांत बोरकुटे, राहुल बोरकुटे, निरज भिमटे, सचिन निलस्कर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र फाटे यांनी केले तर आभार जावेद रिझवी यांनी मानले.

# बोरीबारा गावापासून आज सुरू होणार यशोदानदी संवाद यात्रा

## ‘चला जाणूया नदीला‘ अभियानांत नागरिकांसोबत संवाद




**वर्धा/जनमाध्यम प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नद्या स्वच्छ, सुंदर आणि अमृतवाहिनी करण्याकरीता ‘चला जाणूया नदीला‘ अभियानात ता.३०रोजी आर्वी तालुक्यातील बोरीबारा गावापासून यशोदा नदी संवाद यात्रेला सुरुवात केली जाणार आहे.

यापूर्वी या अभियानात धाम, वणानदी संवाद यात्रा पूर्ण झाली आहे.आता जिल्ह्यातील यशोदा या तिसऱ्या नदीची संवाद यात्रा उद्या ता.३०पासून सुरू होत आहे.

यशोदा नदी संवाद यात्रेच्या शुभारंभाप्रसंगी जिल्हा समन्वय समितीतील शासकीय सदस्यांसह जिल्ह्यातील नद्यांचे समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनिल राहाणे, यशोदा नदीच्या संवादयात्रेची जबाबदारी असलेले कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रीय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे यांच्या विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, गावातील सरपंच, नागरिक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

‘चला जाणूया नदीला‘, हे अभियान विविध उद्देशाने राबविण्यात येत आहे.नदीला स्वच्छ, सुंदर करण्यासोबतच तिला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्याकरीता हे अभियान महत्वाची भूमिका पार पाडत आहे.यासोबतच जनसामान्यांना नदी साक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे, नागरिकांच्या सहकार्याने नदींचा सर्वंकष उभ्यास आणि प्रचार- प्रसार करणे, नदींना अमृतवाहिनी करण्यास मसुदा तयार करणे, नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य, याबाबत प्रचार-प्रसार रुपरेषा आखणे, नदीचा तट, प्रवाह, जैवविविधतेबाबत प्रचार प्रसार नियोजन करणे, नदी खोऱ्यांचे नकाशे, नदीची पूररेषा, पाणलोट क्षेत्राचे नकाशे, मातीचे क्षरण, पर्जन्याच्या नोंदी, मागील पाच वर्षातील पूर आणि दुष्काळाच्या नोंदी याची माहिती या यात्रेदरम्यान संकलित केली जाणार आहे.याशिवाय पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजलस्तर उंचावण्याकरीता काय उपाययोजना करता येतील, याचा देखील अभ्यास यात्रेदरम्यान केला जाणार आहे. नदीमध्ये अतिक्रमण, शोषण आणि प्रदुषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यास देखील केला जाणार आहे.नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी ही यात्रा महत्वाची ठरणार आहे.

यशोदा नदी काठावरील आर्वी, वर्धा, देवळी आणि हिंगणघाट तालुक्यातील गावांची ही यात्रा परिक्रमा करणार आहे.या यात्रेत गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्तरावरील कर्मचारी, ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# यशोदा नदी संवाद यात्रेस गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने सुरुवात

## - बोरी येथे शिवारफेरी, जलपुजन, जलप्रतिज्ञा
## - नदीला वाचविण्यासाठी गावकऱ्यांचे प्रबोधन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वर्धा** ■ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरु करण्यात आलेल्या चला जाणूया नदीला अभियानांतर्गत यशोदा नदीच्या संवाद यात्रेस आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथे गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभागाने सुरुवात झाली. नदीचे जलपुजन केल्यानंतर शिवारफेरी काढण्यात आली. त्यानंतर गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी बोरीच्या सरपंच मिराबाई कनेरी, उपसरपंच सोनाली मुंदेकर, सदस्य शंकर कासार, नदी समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, उल्हास जैन, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रिय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे, सेंद्रीय शेती शेतकरी दिलीप राम, मुख्याध्यापक पुप्पलवार आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळेत झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांनी यशोदा नदी संवाद यात्रेचे महत्व सांगितले. नद्यांमध्ये अलिकडे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत आहे. नदी पात्रात अतिक्रमण होत असल्याने तिचे प्रवाह बदलत आहे. नदीची जैवविविधता, तिचे पावित्र्य अलिकडे नष्ट होत आहे. त्यामुळे नदीला वाचविणे फार आवश्यक झाले आहे. त्यासाठीच नदी संवाद यात्रा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मान्यवरांनी सांगितले.




नदीला तिचे पुर्वीचे सुंदर रुप प्राप्त करून देण्यासाठी गावकऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या अभियानात गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. नदीचे पुजन केल्यानंतर गावात शिवारफेरी काढण्यात आली. या फेरीत ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नदी संवाद यात्रेनिमित्त तयार करण्यात आलेल्या जनजागृती घडिपुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. नैसर्गिक शेती करणारे शेतकरी दिपील राम यांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. नैसर्गित शेतीचे महत्व या विषयावर या शेतकऱ्याने उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला बजाज फाऊंडेशनचे विजय ठाकरे, प्रशांत बोरकुटे, राहुल बोरकुटे, निरज भिमटे, सचिन निलस्कर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र फाटे यांनी केले तर आभार जावेद रिझवी यांनी मानले.

# चला जाणूया नदीला अभियानांतर्गत आजपासून यशोदा नदी संवाद यात्रा

*** नदी काठावरील गावांची परिक्रमा करणार**
*** गावकऱ्यांशी संवाद साधत जनजागृती**

बनविण्यासाठी चला जाणूया नदीला अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात जिल्ह्यातील तीन नद्यांचा समावेश आहे. धाम व वणा नदीनंतर आता जिल्ह्यातील यशोदा या तिसऱ्या नदीची संवाद यात्रा उद्या दि. ३० मे पासून आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथून सुरु होत आहे.

यशोदा नदी संवाद यात्रेच्या शुभारंभाप्रसंगी जिल्हा समन्वय समितीतील शासकीय सदस्यांसह जिल्ह्यातील नद्यांचे समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, यशोदा नदीच्या संवाद यात्रेची जबाबदारी असलेले कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रिय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे यांच्या विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी गावातील सरपंच, गावकरी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

चला जाणूया नदीला हे अभियान विविध उद्देशाने राबविण्यात येत आहे. नदीला स्वच्छ, सुंदर करण्यासोबतच तिला तिचे मुळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी हे अभियान महत्वाची भूमिका पार पाडत आहे. यासोबतच जन-सामान्यांना नदी साक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे, नागरिकांच्या सहकार्याने नदींचा सर्वंकष उभ्यास व प्रचार प्रसार करणे, नदींना अमृत वाहिनी बनविण्यासाठी मसुदा तयार करणे, नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार प्रसार रुपरेषा आखणे, नदीचा तट, प्रवाह, जैवविविधतेबाबत प्रचार प्रसार नियोजन करणे, नदी खोऱ्यांचे नकाशे, नदीची पुररेषा, पाणलोट क्षेत्राचे नकाशे, मातीचे क्षरण, पर्जन्याच्या नोंदी, मागील पाच वर्षातील पूर आणि दुष्काळाच्या नोंदी याची माहिती या यात्रेदरम्यान संकलित केली जाणार आहे.

याशिवाय पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजलस्तर उंचावण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याचा देखील अभ्यास यात्रेदरम्यान केला जाणार आहे. नदीमध्ये अतिक्रमण, शोषण आणि प्रदुषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यास देखील केला जाणार आहे. नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी ही यात्रा महत्वाची ठरणार आहे. नदी काठावरील आर्वी, वर्धा, देवळी व हिंगणघाट तालुक्यातील गावांची ही यात्रा परिक्रमा करणार आहे. या यात्रेत गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्तरावरील कर्मचारी, ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तरुण भारत
Paschim Vidarbha | 2023-05-30 | Page- 11
epaper.tarunbharat.net

# आजपासून यशोदा नदी संवाद यात्रा

◆ **वर्धा, २९ मे**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नद्या स्वच्छ, सुंदर व अमृत वाहिनी बनविण्यासाठी चला जाणू या नदीला अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात जिल्ह्यातील तीन नद्यांचा समावेश आहे. धाम व वणा नदीनंतर आता जिल्ह्यातील यशोदा या तिसऱ्या नदीची संवाद यात्रा मंगळवार ३० मेपासून आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथून सुरू होत आहे.

यशोदा नदी संवाद यात्रेच्या शुभारंभाप्रसंगी जिल्हा समन्वय समितीतील शासकीय सदस्यांसह जिल्ह्यातील नद्यांचे समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाणे, यशोदा नदीच्या संवाद यात्रेची जबाबदारी असलेले कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रीय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे यांच्या विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, गावातील सरपंच, गावकरी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी ही यात्रा महत्त्वाची ठरणार आहे. नदी काठावरील आर्वी, वर्धा, देवळी व हिंगणघाट तालुक्यातील गावांची ही यात्रा परिक्रमा करणार आहे.

◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments

सकाळ

# आजपासून यशोदा नदी संवाद यात्रा

## चला जाणूया नदीला अभियानांतर्गत : नदी काठावरील गावांची परिक्रमा करणार

▸ **सकाळ वृत्तसेवा**

वर्धा, ता. २९ : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नद्या स्वच्छ, सुंदर व अमृत वाहिणी बनविण्यासाठी चला जाणूया नदीला अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात जिल्ह्यातील तीन नद्यांचा समावेश आहे. धाम व वणा नदीनंतर आता जिल्ह्यातील यशोदा या तिसऱ्या नदीची संवाद यात्रा मंगळवारी (ता. ३०) आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथून सुरू होत आहे.

यशोदा नदी संवाद यात्रेच्या प्रारंभा प्रसंगी जिल्हा समन्वय समितीतील




शासकीय सदस्यांसह जिल्ह्यातील नद्यांचे समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, यशोदा नदीच्या संवाद यात्रेची जबाबदारी असलेले कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रिय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे यांच्या विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी गावातील सरपंच, गावकरी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

चला जाणूया नदीला हे अभियानात जनसामान्यांना नदी साक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे, नागरिकांच्या सहकार्याने नदींचा सर्वंकष उभ्यास व प्रचार प्रसार करणे, नदींना अमृत वाहिनी बनविण्यासाठी मसुदा तयार करणे, नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार प्रसार रुपरेषा आखणे, नदीचा तट, प्रवाह, नदी खोऱ्यांचे नकाशे, नदीची पुररेषा, पाणलोट क्षेत्राचे नकाशे, मातीचे क्षरण, पर्जन्याच्या नोंदी, गत पाच वर्षांतील पूर आणि दुष्काळाच्या नोंदी याची माहिती या यात्रेदरम्यान संकलित केली जाणार आहे.

याशिवाय पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजलस्तर उंचावण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याचा देखील अभ्यास यात्रेदरम्यान केला जाणार आहे. नदीमध्ये अतिक्रमण, शोषण आणि प्रदूषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यास देखील केला जाणार आहे. नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी ही यात्रा महत्त्वाची ठरणार आहे. नदी काठावरील आर्वी, वर्धा, देवळी व हिंगणघाट तालुक्यातील गावांची ही यात्रा परिक्रमा करणार आहे.

# यशोदा नदी संवाद यात्रा आज से

## नदी तट के गांवों की होगी परिक्रमा

■ **वर्धा,** ब्यूरो. आजादी के अमृत महोत्सव वर्ष उपलक्ष्य में नदी स्वच्छ, सुंदर, अमृत वाहिनी बनाने चलो समझें नदियों को अभियान चलाया जा रहा है. अभियान में जिले की तीन नदियों का समावेश है. धाम व वणा नदी के बाद अब जिले की यशोदा इस तीसरी नदी की संवाद यात्रा 30 मई से आर्वी तहसील के बोरीबारा से प्रारंभ हो रही है. यशोदा नदी संवाद यात्रा के शुभारंभ प्रसंग पर जिला समन्वय समिति के शासकीय सदस्यों सहित नदियों के समन्वयक तथा जलतज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, यशोदा नदी संवाद यात्रा की जिम्मेदारी वाले कमलनयन बजाज फाउंडेशन के क्षेत्रीय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे की विविध सामाजिक संस्था के प्रतिनिधि गांव के सरपंच, ग्रामीण, विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित रहेंगे. चलो समझें नदियों को यह अभियान विविध उद्देश्य से चलाया जा रहा है.



### बाढ़ व सूखा की स्थिति का अभ्यास

नदी को अपने मूल रूप में देने के लिए यह अभियान अहम भूमिका निभाएगा. जनसामान्यों को नदी साक्षर करने उपाय योजना बनाने, नागरिकों के सहयोग से नदी का सर्वकष अभ्यास व प्रचार, प्रसार करने, नदी को अमृत वाहिनी बनाने मसौदा तैयार करने, नदी का स्वास्थ्य तथा मानवी स्वास्थ्य आदि प्रचार प्रसार रूपरेखा बनाने, नदी का तट, प्रवाह, जैवविविधता के बारे में प्रचार-प्रसार नियोजन करने, नदी दरियों के नक्शा, नदी की बाढ़ रेखा, पाणलोट क्षेत्र के नक्शे, पर्जन्य का पंजीयन, पिछले पांच वर्ष पहले बाढ़ तथा सूखा स्थिति का पंजीयन आदि जानकारी संवाद यात्रा के जरिए ली जाएगी.

### भूजलस्तर बढ़ाने पर दिया जाएगा जोर

इसके अलावा पानी उचित जगह रोककर भूजलस्तर बढ़ाने के लिए क्या करना है, इसका भी अभ्यास किया जाएगा. नदी में अतिक्रमण, शोषण तथा प्रदूषण इन तीन प्रमुख कारणों का अभ्यास किया जाएगा. नदी तट के आर्वी, वर्धा, देवली व हिंगनघाट तहसील के गांवों की परिक्रमा की जाएगी. यात्रा में गांव के सरपंच, उपसरपंच, ग्रामस्तर के कर्मचारी, ग्रामीण, विद्यार्थी, सामाजिक संस्था के प्रतिनिधियों को बड़ी संख्या में मौजूद रहने का आह्वान किया गया है.

# यशोदा नदी संवाद यात्रेस गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## नदीला वाचविण्यासाठी गावकऱ्यांचे प्रबोधन



**वर्धा, दि. ३० महासागर प्रतिनिधी.** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरु करण्यात आलेल्या चला जाणूया नदीला अभियानांतर्गत यशोदा नदीच्या संवाद यात्रेस आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथे गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभागाने सुरुवात झाली. नदीचे जलपुजन केल्यानंतर शिवारफेरी काढण्यात आली. त्यानंतर गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी बोरीच्या सरपंच मिरा कनेरी, उपसरपंच सोनाली मुंदेकर, सदस्य शंकर कासार, नदी समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाणे, उल्हास जैन, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रिय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे, सेंद्रीय शेती शेतकरी दिलीप राम, मुख्याध्यापक पुप्पलवार आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळेत झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांनी यशोदा नदी संवाद यात्रेचे महत्व सांगितले. नद्यांमध्ये अलिकडे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत आहे. नदी पात्रात अतिक्रमण होत असल्याचे तिचे प्रवाह बदलत आहे. नदीची जैवविविधता, तिचे पावित्र्य अलिकडे नष्ट होत आहे. त्यामुळे नदीला वाचविणे फार आवश्यक झाले आहे. त्यासाठीच नदी संवाद यात्रा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मान्यवरांनी सांगितले.नदीला तिचे पुर्वीचे सुंदर रुप प्राप्त करून देण्यासाठी गावकऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या अभियानात गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.कार्यक्रमाला बजाज फाऊंडेशनचे विजय ठाकरे, प्रशांत बोरकुटे, राहुल बोरकुटे, निरज भिमटे, सचिन निलस्कर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र फाटे यांनी केले तर आभार जावेद रिझवी यांनी मानले.

### बोरी येथे शिवारफेरी, जलपुजन, जलप्रतिज्ञा

बोरी येथे नदीचे पुजन केल्यानंतर गावात शिवारफेरी काढण्यात आली. या फेरीत ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नदी संवाद यात्रेनिमित्त तयार करण्यात आलेल्या जनजागृती घडिपुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. नैसर्गिक शेती करणारे शेतकरी दिपील राम यांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. नैसर्गिक शेतीचे महत्व या विषयावर या शेतकऱ्याने उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## जागृती • 'चला जाणूया नदीला' अभियान; बोरीबारातून प्रारंभ

# 'यशोदा नदी संवाद' यात्रा आजपासून

**वर्धा,** ब्युरो. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नद्या स्वच्छ, सुंदर व अमृत वाहिणी बनविण्यासाठी चला जाणूया नदीला अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात जिल्ह्यातील तीन नद्यांचा समावेश आहे. धाम व वणा नदीनंतर आता जिल्ह्यातील यशोदा या तिसऱ्या नदीची संवाद यात्रा उद्या 30 मे पासून आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथून सुरु होत आहे.

यशोदा नदी संवाद यात्रेच्या शुभारंभाप्रसंगी जिल्हा समन्वय समितीतील शासकीय सदस्यांसह जिल्ह्यातील नद्यांचे समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, यशोदा नदीच्या संवाद यात्रेची जबाबदारी असलेले कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रीय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे यांच्या विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी गावातील सरपंच, गावकरी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

चला जाणूया नदीला हे अभियान विविध उद्देशाने राबविण्यात येत आहे. नदीला स्वच्छ, सुंदर करण्यासोबतच तिला तिचे मुळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी हे अभियान महत्वाची भूमिका पार पाडत आहे. यासोबतच जनसामान्यांना नदी साक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे, नागरिकांच्या सहकार्याने नदींचा सर्वंकष उभ्यास व प्रचार प्रसार करणे, नदींना अमृत वाहिनी बनविण्यासाठी मसुदा तयार करणे, नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार प्रसार रुपरेषा आखणे, नदीचा तट, प्रवाह, जैवविविधतेबाबत प्रचार प्रसार नियोजन करणे, नदी खोऱ्यांचे नकाशे, नदीची पुररेषा, पाणलोट क्षेत्राचे नकाशे, मातीचे क्षरण, पर्जन्याच्या नोंदी, मागील पाच वर्षातील पूर आणि दुष्काळाच्या नोंदी याची माहिती या यात्रेदरम्यान संकलित केली जाणार आहे.




## गावकऱ्यांशी संवाद साधत जनजागृती

याशिवाय पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजलस्तर उंचावण्यासाठी काय उपाययोजना करता येतील, याचा देखील अभ्यास यात्रेदरम्यान, केला जाणार आहे. नदीमध्ये अतिक्रमण, शोषण आणि प्रदूषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यासदेखील केला जाणार आहे. नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी ही यात्रा महत्वाची ठरणार आहे. नदी काठावरील आर्वी, वर्धा, देवळी व हिंगणघाट तालुक्यातील गावांची ही यात्रा परिक्रमा करणार आहे. या यात्रेत गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्तरावरील कर्मचारी, ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# यशोदा नदी संवाद यात्रेस गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने सुरुवात

*** बोरी येथे शिवारफेरी, जलपुजन, जलप्रतिज्ञा**

*** नदीला वाचविण्यासाठी गावकऱ्यांचे प्रबोधन**



**वर्धा (जिमाका) :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरु करण्यात आलेल्या चला जाणूया नदीला अभियानांतर्गत यशोदा नदीच्या संवाद यात्रेस आज आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथे गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभागाने सुरुवात झाली. नदीचे जलपुजन केल्यानंतर शिवारफेरी काढण्यात आली. त्यानंतर गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी बोरीच्या सरपंच मिराबाई कनेरी, उपसरपंच सोनाली मुंदेकर, सदस्य शंकर कासार, नदी समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, उल्हास जैन, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रिय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे, सेंद्रीय शेती शेतकरी दिलीप राम, मुख्याध्यापक पुप्पलवार सर आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळेत झालेल्य कार्यक्रमात मान्यवरांनी यशोदा नर्द संवाद यात्रेचे महत्व सांगितले. नद्यांमध्ये अलिकडे मोठ्य प्रमाणावर प्रदुषण होत आहे. नदी पात्रात अतिक्रमण होत असल्याचे तिचे प्रवाह बदलत आहे. नदीर्च जैवविविधता, तिचे पावित्र्य अलिकडे नष्ट होत आहे. त्यामुळे नदीला वाचविणे फार आवश्यक झाले आहे. त्यासाठीच नदी संवाद यात्रा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

नदीला तिचे पुर्वीचे सुंदर रुप प्राप्त करून देण्यासाठी गावकऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या अभियानात गावकऱ्यांनी मोठ्य संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळ मान्यवरांनी केले. नदीचे पुजन केल्यानंतर गावात शिवारफेरी काढण्यात आली. या फेरीत ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नदी संवाद यात्रेनिमित्त तयार करण्यात आलेल्या जनजागृती घडिपुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. नैसर्गिक शेती करणा शेतकरी दिपील राम यांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. नैसर्गित शेतीचे महत्व य विषयावर या शेतकऱ्याने उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला बजाज फाऊंडेशनचे विजय ठाकरे, प्रशांत बोरकुटे, राहुल बोरकुटे, निरज भिमटे, सचिन निलस्कर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र फाटे यांनी केले त आभार जावेद रिझवी यांनी मानले.

# यशोदा नदी संवाद यात्रेस गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने सुरुवात

## बोरी येथे शिवारफेरी, जलपुजन, जलप्रतिज्ञा
## नदीला वाचविण्यासाठी गावकऱ्यांचे प्रबोधन




**वर्धा-** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरु करण्यात आलेल्या चला जाणूया नदीला अभियानांतर्गत यशोदा नदीच्या संवाद यात्रेस आज आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथे गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभागाने सुरुवात झाली. नदीचे जलपुजन केल्यानंतर शिवारफेरी काढण्यात आली. त्यानंतर गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी बोरीच्या सरपंच मिरा कनेरी, उपसरपंच सोनाली मुंदेकर, सदस्य शंकर कासार, नदी समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, उल्हास जैन, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रिय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे, सेंद्रीय शेती शेतकरी दिलीप राम, मुख्याध्यापक पुप्पलवार सर आदी उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळेत झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांनी यशोदा नदी संवाद यात्रेचे महत्व सांगितले. नद्यांमध्ये अलिकडे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत आहे. नदी पात्रात अतिक्रमण होत असल्याचे तिचे प्रवाह बदलत आहे. नदीची जैवविविधता, तिचे पावित्र्य अलिकडे नष्ट होत आहे. त्यामुळे नदीला वाचविणे फार आवश्यक झाले आहे. त्यासाठीच नदी संवाद यात्रा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मान्यवरांनी सांगितले. नदीला तिचे पुर्वीचे सुंदर रुप प्राप्त करून देण्यासाठी गावकऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या अभियानात गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. नदीचे पुजन केल्यानंतर गावात शिवारफेरी काढण्यात आली.या फेरीत ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.नदी संवाद यात्रेनिमित्त तयार करण्यात आलेल्या जनजागृती घडिपुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. नैसर्गिक शेती करणारे शेतकरी दिपील राम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नैसर्गित शेतीचे महत्व या विषयावर या शेतकऱ्याने उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला बजाज फाऊंडेशनचे विजय ठाकरे, प्रशांत बोरकुटे, राहुल बोरकुटे, निरज भिमटे, सचिन निलस्कर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र फाटे यांनी केले तर आभार जावेद रिझवी यांनी मानले.

# बोरीबारा गावापासून यशोदानदी संवाद यात्रेला सुरुवात

## शिवारफेरी, जलपूजन, जलप्रतिज्ञेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**वर्धा / जनमाध्यम प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरु करण्यात आलेल्या 'चला जाणूया नदीला' अभियानांतर्गत यशोदा नदीच्या संवाद यात्रेस आज आर्वी तालुक्यातील बोरी बारा गावापासून सुरुवात झाली. यानिमित्त काढलेल्या शिवारफेरी, जलपूजन, जलप्रतिज्ञेला बोरीबारा तसेच परिसरातील गावाच्या नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी गावातील नागरिकांसोबत संवाद साधत त्यांचे नदीप्रदूषण वाचविण्यासह जलसंवर्धनाबाबत प्रबोधन करण्यात आले.

यावेळी बोरीच्या सरपंच मिरा कनेरी, उपसरपंच सोनाली मुंदेकर, सदस्य शंकर कासार, नदी समन्वयक माधव वाघोटस्थाने, भारत महोदय, सुनिल रहाणे, उल्हास जैन, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रीय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे, सेंद्रीय शेती कसणारे शेतकरी दिलीप राम, मुख्याध्यापक पुप्पलवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा परिषद शाळेत झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांनी यशोदा नदी संवाद यात्रेचे महत्व सांगितले. नद्यांमध्ये अलिकडे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे. नदी पात्रात अतिक्रमण होत असल्याने नदीचा प्रवाह बदलत आहे. नदीची जैवविविधता, तिचे पावित्र्य अलिकडे नष्ट होत आहे. त्यामुळे नदीला वाचविणे फार आवश्यक झाले आहे. त्यासाठीच नदी संवाद यात्रा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

नदीला तिचे पूर्वीचे सुंदर रुप प्राप्त करून देण्याकरीता गावातील नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या अभियानात गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. नदीचे पूजन केल्यानंतर गावात शिवारफेरी काढण्यात आली. या फेरीत गावातील नागरिक, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नदी संवाद यात्रेनिमित्त तयार करण्यात आलेल्या जनजागृती घडीपुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. नैसर्गिक शेती करणारे शेतकरी दिपील राम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नैसर्गिक शेतीचे महत्व या विषयावर शेतकरी दिलीप राम यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला बजाज फाऊंडेशनचे विजय ठाकरे, प्रशांत बोरकुटे, राहुल बोरकुटे, नीरज भिमटे, सचिन निलस्कर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र फाटे यांनी केले. जावेद रिझवी यांनी आभार मानले.

जागृती • बोरी येथे 'चला जाणूया नदीला' अभियान

# नदीला वाचविण्यासाठी गावकऱ्यांचे प्रबोधन



**वर्धा,** ब्युरो. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरु करण्यात आलेल्या 'चला जाणूया नदीला' अभियानांतर्गत यशोदा नदीच्या संवाद यात्रेला आज आर्वी तालुक्यातील बोरी बारा येथे गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभागाने सुरुवात झाली. नदीचे जलपूजन केल्यानंतर शिवारफेरी काढण्यात आली, त्यानंतर गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी बोरीच्या सरपंच मिरा कनेरी, उपसरपंच सोनाली मुंदेकर, सदस्य शंकर कासार, नदी समन्वयक तथा जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने, भरत महोदय, सुनील रहाने, उल्हास जैन, कमलनयन बजाज फाऊंडेशनचे क्षेत्रिय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे, शेतकरी दिलीप राम, मुख्याध्यापक पुष्पलवार आदी उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळेत झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांनी यशोदा नदी संवाद यात्रेचे महत्व सांगितले. नद्यांमध्ये अलिकडे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत आहे. नदी पात्रात अतिक्रमण होत असल्याने तिचे प्रवाह बदलत आहे. नदीची जैवविविधता, तिचे पावित्र्य अलिकडे नष्ट होत आहे. त्यामुळे नदीला वाचविणे फार आवश्यक झाले आहे. त्यासाठीच 'नदी संवाद यात्रा' उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

## ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

नदीला तिचे पुर्वीचे सुंदर रुप प्राप्त करून देण्यासाठी गावकऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या अभियानात गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. नदीचे पुजन केल्यानंतर गावात शिवारफेरी काढण्यात आली. या फेरीत ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नदी संवाद यात्रेनिमित्त तयार करण्यात आलेल्या जनजागृती घडिपुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. नैसर्गिक शेती करणारे शेतकरी दिलीप राम यांचा सत्कार करण्यात आला. 'नैसर्गिक शेतीचे महत्त्व' या विषयावर शेतकऱ्याने उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला विजय ठाकरे, प्रशांत बोरकुटे, राहुल बोरकुटे, निरज भिमटे, सचिन निलस्कर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक महेंद्र फाटे यांनी केले तर आभार जावेद रिझवी यांनी मानले.